# SNDT WOMEN'S UNIVERSITY
# MUMBAI

## वृत्त प्रकाशन

विद्यापीठ स्थापना दिवस २०१९
५ जुलै, २०१९, मुंबई

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ हे महिलांच्या उच्चशिक्षणाशी समानार्थी समजले जाते. विद्यापीठाचा १०४ वा स्थापना दिवस समारोह, शुक्रवार ५ जुलै, २०१९ रोजी विद्यापीठाच्या चर्चगेट प्रांगणातील सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर सभागृहात सकाळी ११.०० वाजता साजरा झाला.

स्त्री शिक्षणामधील विद्यापीठाचे १०३ वर्षांचे महत्वपूर्ण योगदान हे देशातील स्त्रीयांसाठी व संपूर्ण भारतीय समाजासाठी अभिमानाची बाब आहे. १९१६ सालापासून या विद्यापीठाने लाखो स्त्रियांना शिक्षीत केल्यामुळे प्रगतीशील समाजाची निर्मिती झाली आहे. सध्या ५०,००० पेक्षा जास्त विद्यार्थीनींनी विद्यापीठाच्या ३९ विभाग, १३ संस्था आणि १८३ संलग्न महाविद्यालयांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी नोंदणी केली आहे. भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्ररणेतून निर्माण झालेल्या आणि ''संस्कृता स्त्री पराशक्ती'' हे बोधवाक्य असलेल्या या विद्यापीठाचे शिक्षणातून महिला सक्षमीकरण हे ध्येय आहे.

विद्यापीठाच्या १०४ व्या स्थापना दिवसाच्या समारोहाच्या सुरूवातीला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. शशीकला वंजारी यांनी महर्षी कर्वेच्या पवित्र स्मृतीना अभिवादन करून विद्यापीठाच्या अनेक उपक्रमाबद्‌दल माहिती दिली. समारोहाचे विशेष अतिथि प्रा. अनिरूध्द देशपांडे यांच्या मार्गदर्शनाबद्‌दल आणि विद्यापीठाच्या **''अखिल भारतीय अधिकार क्षेत्र''** म्हणून मान्यताप्राप्तीसाठी विशेष योगदान दिल्याबद्यल विद्यापीठ अनुदान आयोगाचे, उपअध्यक्ष, डॉ. भूषण पटवर्धन यांचे आभार मानले.

या कार्यक्रमात ''महर्षी कर्वे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार''—डॉ. कविता पाटील, एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय, नाशिक, ''उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार''—श्री. प्रकाश लक्ष्मण जाधव, एम.डी. शाह महिला महाविद्यालय, मलाड आणि ''सर्वोत्तम महाविद्यालय पुरस्कार''—मणीबेन नानावटी महिला महाविद्यालय यांना प्रदान करण्यात आला. याच समारोहात जीवनातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सात माजी विद्यार्थीनींना सन्मानित करण्यात आले. या शिवाय जाधवपूर युनिव्हर्सिटी अल्युमिनाय असोसिएशन तर्फे, श्रीमती हेमलता त्रीवेदी शिष्यवृत्ती विद्यापीठातील तीन विद्यार्थीनीना देण्यात आली. या कार्यक्रात प्रथमच नऊ विद्यार्थीनीना भाऊबीज निधीतून शिष्यवृत्ती देण्यात आली.

कार्यक्रमाचे विशेष अतिथि माननीय राऊल ठाकरसी (चेअरमन, कॅप्रीकॉर्न रीआल्टी लिमिटेड) यांनी निमंत्रणाबद्यल आभार व्यक्त केले आणि विद्यापीठाला पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे दुसरे सन्माननीय अतिथी श्री. अनिरूध्द देशपांडे (माजी प्राचार्य, बीएमसीसी, पुणे) यांनी त्यांच्या भाषणात स्त्री सक्षमीकरणातील प्रमुख व्यक्तीमत्वांचा ऐतिहासीक आढावा घेतला आणि भारतीय स्त्री शक्तीचा सन्मान करण्यासाठी चर्चे पेक्षा कृतीवर भर द्यावा असे सांगितले.

स्थापना दिवसाच्या अभिभाषणात प्रमुख पाहुणे डॉ. भूषण पटवर्धन (उपअध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग) यांनी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाला **''केंद्रीय विद्यापीठ''** म्हणून मान्यता मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. संशोधन क्षमता विकासासाठी विद्यापीठाने कर्वे—ठाकरसी अध्यासन केंद्र स्थापन करावे अशी इच्छा व्यक्त केली आणि विद्यापीठाच्या भाऊबीज निधीला रूपये २५,०००/ देणगी जाहीर केली.

कार्यक्रमाचा समारोप कुलसचिव, डॉ.दीपक देशपांडे यांच्या आभारप्रदर्शनाने झाला.